# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः14.02.2025** **वारःशुक्रवार**

1. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्याशी द्विपक्षीय चर्चा
2. संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्या सत्राची सांगता, प्राप्तीकर कायदा सोपा करणारं नवीन प्राप्तीकर विधेयक लोकसभेत सादर
3. जलसंधारण विभागातील नवनियुक्त अधिकाऱ्यांना मुख्यमंत्र्यांच्या हस्ते नियुक्तीपत्रांचं वितरण
4. पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचं दिमाखदार सोहळ्यात उद्घाटन आणि
5. ज्येष्ठ शास्त्रीय गायक पंडित प्रभाकर कारेकर कालवश

**मोदी-अमेरिका दौरा**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज वॉशिंग्टन डीसी इथल्या व्हाईट हाऊसमध्ये अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्याशी द्विपक्षीय चर्चा केली. ट्रम्प यांच्या दुसऱ्या राष्ट्राध्यक्षपदाच्या कार्यकाळात पंतप्रधान मोदींचा हा पहिलाच अमेरिका दौरा आहे. भारत अमेरिका यांच्यातील धोरणात्मक भागीदारी यापुढंही सुरूच राहणार असून ट्रम्प यांनी दोन्ही देशातील संबंध अधिक दृढ करण्यासाठी मोलाचं योगदान दिलं आहे, असं मत मोदी यांनी व्यक्त केलं. हे युद्धाचं युग नसून प्रश्न मुत्सद्देगिरीनं सोडवले पाहिजेत असं सांगत ट्रम्प यांनी शांतता प्रस्थापित करण्यासाठी पुढाकार घेतल्याबद्दल मोदींनी आनंद व्यक्त केला. भारत अमेरिकेकडून तेल आणि वायू खरेदी करेल, असंही मोदी यांनी सांगितलं.

**संसद-मुंबई**

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा पहिला टप्पा संपल्यामुळे संसदेची दोन्ही सभागृह काल येत्या 10 मार्चपर्यंत स्थगित करण्यात आली. गेल्या महिन्यात 31 जानेवारी रोजी अधिवेशनाचा पहिला टप्पा सुरू झाला होता. अधिवेशनाच्या पहिल्या टप्प्यात 112 टक्के कामकाज झाल्याचं लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी सांगितलं. तत्पूर्वी वक्फ दुरुस्ती विधेयक 2024 बाबतच्या संयुक्त समितीचा अहवाल काल संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये विरोधकांच्या गदारोळात सादर करण्यात आला.

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी काल नवीन प्राप्तीकर विधेयक लोकसभेत मांडलं. विद्यमान प्राप्तीकर कायदा सोपा आणि सुटसुटीत करण्यासाठी हे नवीन विधेयक सरकारनं सादर केलं आहे. हे विधेयक संसदीय स्थायी समितीकडे पाठवण्याची शिफारस सीतारामन यांनी केली. आगामी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी समितीनं अहवाल सादर करावा अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. सीतरामन यांनी काल राज्यसभेत अर्थसंकल्पावरील चर्चेला उत्तरही दिलं. सामान्य नागरिकांना महागाईचा फटका बसू नये यासाठी सरकार विविध उपाययोजना सुरू ठेवेल, अशी ग्वाही त्यांनी दिली. यंदाचा केंद्रीय अर्थसंकल्प हा सर्वसमावेशक विकास सुनिश्चित करणारा आहे, असं त्या म्हणाल्या. प्राप्तीकरातल्या सवलतींचा फायदा केवळ श्रीमंतांना होईल, हा विरोधकांचा आरोप त्यांनी फेटाळून लावला.

**मुख्यमंत्री**

जलसंधारण विभागाच्या माध्यमातून राबवण्यात येत असलेलं जलयुक्त शिवार हे महत्वाकांक्षी अभियान असून लोकसहभागातून झालेली ही कामं म्हणजे जलक्रांतीच्या दिशेनं पडलेलं पाऊल असल्याचं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. मृद आणि जलसंधारण विभागाअंतर्गत जलसंधारण अधिकारी गट ब पदासाठीच्या नियुक्ती पत्रांचं वितरण मुख्यमंत्र्यांच्या हस्ते काल मुंबईत करण्यात आलं. त्यावेळी ते बोलत होते. जलसंधारण विभागातील नवनियुक्त अधिकाऱ्यांनी

सामान्य माणूस आणि शेतकऱ्यांच्या जीवनात परिवर्तन घडवण्याचं ध्येय बाळगावं, असं आवाहन त्यांनी केलं. यावेळी बोलताना ते म्हणाले.....

**<u>पवार</u>**

राज्यातील विकासकामांची गती कायम ठेवण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयानं काम करावं. अशी सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काल दिली. विलंबामुळे प्रकल्पांच्या किंमतीत वाढ होऊन राज्याचे दीर्घकालीन होणार नुकसान टाळण्यासाठी नियोजित वेळेत विकास प्रकल्प मार्गी लावण्यावर भर द्यावा, तसंच पुण्यात 'एम्स' उभारण्यासाठी केंद्रीय आरोग्य मंत्रालयाकडे पाठपुरावा करण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या. पवार यांच्या अध्यक्षतेखाली काल मंत्रालयात, उपमुख्यमंत्र्यांच्या प्रकल्प सनियंत्रण कक्षाची बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी ते बोलत होते. पुणे रिंग रोड, मेट्रो, 'कर्जत-भीमाशंकर-खेड-शिरुर' रस्ता अशा अनेक विषयांवर यावेळी त्यांनी चर्चा केली.

**<u>प्रदेशाध्यक्ष</u>**

माजी आमदार हर्षवर्धन सपकाळ यांची काँग्रेसच्या प्रदेशाध्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे. काँग्रेसचे राष्ट्रीय महासचिव के. सी. वेणुगोपाल यांनी काल प्रसिद्धीपत्रकाद्वारे ही माहिती दिली. तर विजय वडेट्टीवार यांची काँग्रेसच्या विधिमंडळ पक्षाचे नेते म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

**<u>पिफ</u>**

संपूर्ण राज्यासह देश परदेशातल्या चित्रपट रसिकांसाठी पर्वणी ठरणाऱ्या पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचं काल संध्याकाळी एका दिमाखदार सोहळ्यात उद्घाटन झालं. ऐकुया या उद्घाटन सोहळ्याबाबत अधिक वृत्तांत......

**पुणे फिल्म फाउंडेशन राज्य शासनाचा सांस्कृतिक विभाग आणि दादासाहेब फाळके चित्रनगरी यांनी संयुक्तपणे आयोजित केलेल्या पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव अर्थात पिफचं उद्घाटन राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांच्या हस्ते झालं. महोत्सवाचे संचालक डॉ. जब्बार पटेल, विश्वस्त सतीश आळेकर, ज्येष्ठ अभिनेते मोहन आगाशे यांच्यासह सांस्कृतिक विभागाचे वरिष्ठ अधिकारी महोत्सवाचे आंतरराष्ट्रीय परीक्षक, तज्ज्ञ आणि रसिक यावेळी उपस्थित होते. राज्य सरकार मुंबईत 10 एकर जागेवर मनोरंजन क्षेत्रातली जागतिक स्तरावरची शैक्षणिक संस्था उभारणार असल्याचं आशिष शेलार यांनी यावेळी सांगितलं. चित्रपट या कलेविषयी बोलताना ते म्हणाले......**

**यंदाचं वर्ष हे ज्येष्ठ अभिनेते राज कपूर यांचं जन्मशताब्दी वर्ष आहे; त्यानिमित्त शोमन राज कपूर ही यावर्षीच्या महोत्सवाची संकल्पना असल्याचं डॉ. जब्बार पटेल यांनी म्हणाले.**

**प्रसिद्ध अभिनेत्री शुभा खोटे यांना भारतीय चित्रपटसृष्टीतील योगदानाबद्दल 'पीफ डिस्टींग्वीश ॲवार्ड', तर प्रसिद्ध पार्श्वगायिका कविता कृष्णमूर्ती यांना संगीत क्षेत्रातील योगदानासाठी संगीतकार 'एस. डी. बर्मन पुरस्कार' देऊन गौरविण्यात आलं. रसिकांच्या आग्रहस्तव त्यांनी गायलेल्या गाण्याची ही झलक.....**

**उद्घाटन सोहळ्याच्या सुरुवातीला दिवंगत उस्ताद झाकीर हुसेन यांना अभिवादन म्हणून तालकचेरी हा कार्यक्रम सादर करण्यात आला. दिग्दर्शिका मार्गारिटा व्हिसारिओ यांचा ग्लोरिया हा उद्घाटनाचा चित्रपट दाखवण्यात आला. येत्या वीस तारखेपर्यंत चालणाऱ्या या महोत्सवात विविध देश-परदेशातले सुमारे 150 चित्रपट, जागतिक स्पर्धा विभागातले 14 आणि मराठी स्पर्धा विभागातिल 7 चित्रपट दाखवले जाणार आहेत. आकाशवाणी बातम्यासाठी पुण्याहून नितीन जळूकर यांच्यासह माधवी कुलकर्णी.**

**<u>बावनकुळे-अकोला</u>**

वाळू माफियांना रोखण्यासाठी सरकार प्रयत्नशील असून वाळू माफियांवर मोक्का लावणे, हद्दपार करणे यासारखी कारवाई करण्यात येणार असल्याचं महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितलं. ते अकोल्यात आयोजित भाजपच्या

विभागीय मेळाव्या दरम्यान काल माध्यमांशी बोलत होते. कडक कायदे असणारं नवं वाळू धोरण लवकरचं जाहीर करण्यात येणार असल्याचही ते यावेळी म्हणाले.

**निधन**

ज्येष्ठ शास्त्रीय गायक पंडित प्रभाकर कारेकर यांचं बुधवारी रात्री प्रदीर्घ आजारानं मुंबईत त्यांच्या राहत्या घरी निधन झालं. ते 80 वर्षांचे होते. काल संध्याकाळी मुंबईत शिवाजी पार्क स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिव देहावर अंत्यसंस्कार करण्यात आले. 'बोलावा विठ्ठल, पाहावा विठ्ठल', 'मर्मबंधातली ठेव, नभ मेघांनी आक्रमिले', 'वक्रतुंड महाकाय' ही त्यांची काही गाजलेली गीतं. त्यांनी आकाशवाणी आणि दूरदर्शनसाठी संगीताचे अनेक कार्यक्रम केले. ऍर्निट कोलेमन आणि सुलतान खान यांच्याबरोबर त्यांनी केलेला फ्युजन अल्बमही लोकप्रिय झाला.

1944मध्ये गोव्यात जन्मलेल्या कारेकर यांनी पंडीत सुरेश हळदणकर, पंडीत जितेंद्र अभिषेकी आणि पंडीत सी. आर. व्यास यांच्याकडून शास्त्रीय गायनाचं शिक्षण घेतलं. त्यांच्या संगीत कारकिर्दीच्या सन्मानार्थ त्यांना तानसेन सन्मान, संगीत नाटक अकादमी, लता मंगेशकर पुरस्कार, गोमान्त विभूषण पुरस्कार अशा विविध पुरस्कारांनी गौरवण्यात आलं होतं. पंडित प्रभाकर कारेकर यांच्या निधनाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शोक व्यक्त केला आहे.

**राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा**

38व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांचा समारोप आज उतराखंड मधल्या हल्दवानी इथं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या उपस्थितीत होणार आहे. या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये पदकतालिकेत 67 सुवर्ण पदकांसह सैन्य दलाचा संघ प्रथम क्रमांकावर असून 54 सुवर्ण पदकासह महाराष्ट्राचा संघ दुसऱ्या तर 46 सुवर्ण पदकांसह हरियाणा तिसऱ्या स्थानावर आहे.

**हवामान**

येत्या 24 तासात राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.